महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
**समग्र शिक्षा**
**महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई**

क्र.मप्राशिप/सशि/प्रशा/टोनर कार्ट्रेज/२०२२-२३/2661. दिनांक - 22 SEP 20

प्रति,
---------------------
---------------------
---------------------

**विषय : या कार्यालयातील प्रिंटर्सकरिता लागणारे टोनर कार्ट्रेजेस, ड्रम्स रोलर्स पुरवठा करण्यासाठी वार्षिक दरकरार करणेबाबत.**

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४ या कार्यालयातील नविन टोनर कार्ट्रेजेस, ड्रम्स, रोलर्स पुरवठा करण्यासाठी तसेच रिसायकलिंग किंवा रिफिलिंग करणेसाठी वार्षिक दरकरार एक वर्षाच्या कालावधीकरिता सेवाकरार करणेबाबत दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये दर नमूद करण्यात यावे. सदर सेवाकराराबाबतच्या इतर अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

१) संबंधित कंपनीचा नबीन ब्रँड म्हणून टोनर कार्ट्रेज, ड्रम आणि रोलर्स पुरवठा करावे लागतील.

२) प्रपत्र अ मधील टोनर कार्ट्रेजेस, ड्रम्स, रोलर्स व्यतिरिक्त इतर टोनर कार्ट्रेजेस, ड्रम्स, रोलर्स ची कार्यालयास आवश्यकता असल्यास बाजार भावाप्रमाणे सदर टोनर कार्ट्रेजेस, ड्रम्स, रोलर्स पुरवठादारास पुरवठा करावे लागतील.

५) पुरवठादारास दरमहा मासिकरित्या देयके सादर करावी लागणार आहेत. सदर मासिक देयकातून नियमानुसार TDS (IT+GST) व इतर करांची रक्कम कपात करून देयके अदा करण्यात येतील.

६) पुरवठादारास दरपत्रकासोबत इसारा रकमेपोटी (EMD) रू.२,४६९/- इतक्या रकमेचा - समग्र शिक्षा, मुंबई या नावाने कोणताही राष्ट्रीयकृत किंवा शेड्यूल कमर्शिअल बँकेवर काढलेला (Payable at Mumbai) चा धनाकर्ष दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक राहील. इसारा रक्कमेच्या धनाकर्षासह दरपत्रक लिफाफ्यामध्ये बंद लिफाफा सीलबंद करण्यात यावा व सदर लिफाफ्यावर टोनर कार्ट्रेज, ड्रम आणि रोलर्स खरेदी, रिसायकलिंग व रिफिलिंग करीता निविदा असे लिहिण्यात यावे.

७) निवड झालेल्या पुरवठादास सेवाकराराच्या एकूण रकमेच्या ५% प्रमाणे अनामत रक्कम (Security Deposit) सादर करणे बंधनकारक राहील.

D:\Bhosale\Letter.docx

**जवाहर बाल भवन, पहिला मजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड (प.), मुंबई - ४०० ००४.**
टेलिफोन नं. : ०२२-२३६३ ६३१४, २३६७ ९२६७, २३६७ १८०८, २३६७ १८०९, २३६७ ९२७४
ई-मेल : mpspmah@gmail.com, samagra-shiksha@mahedu.gov.in
संकेतस्थळ - https://samagrashiksha.maharashtra.gov.in, https://mpsp.maharashtra.gov.in

८) पात्र ठरलेल्या पुरवठादाराची इसारा रक्कम (EMD) त्यांच्याकडून अनामत सुरक्षा रक्कम (Security Deposit) सादर केल्यानंतर एक महिन्याच्या आत त्यांना परत करण्यात येईल. तसेच अपात्र असलेल्या (Unsuccessful) पुरवठादारांची इसारा रक्कम (EMD) निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एक आठवड्याच्या आत त्यांना परत करण्यात येईल.

९) सदर दरपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळ samagrashiksha.maharashtra.gov.in वर प्रसिद्ध करण्यात आले आहे. इच्छूक पुरवठादार सदर संकेस्थळाला भेट देऊन आवश्यक ती माहिती प्राप्त करून घेऊन विहित मुदतीच्या आत त्यांचे दरपत्रक या कार्यालयास सादर करू शकतील.

१०) या कार्यालयातील टोनर कार्ट्रेजेस, ड्रम्स रोलर्स इ. स्टेशनरी साहित्य खरेदी करणे अथवा रिसायकलिंग किंवा रिफिलींग करणे करिता मागविण्यात आलेली दरपत्रके कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके रद्द करण्याचे अधिकार राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना राहतील.

११) पुरवठादारास न्यायालयीन शुल्क ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर अटी व शर्तीसह करारनामा सादर करावा लागेल.

१२) निवड करण्यात येणाऱ्या पुरवठादाराची सेवा समाधानकारक नसल्यास त्याचा सेवाकरार कोणतेही कारण न देता केव्हाही रद्द करण्याचा अधिकार राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना राहील.

तथापि, आपणांस कळविण्यात येते की, आपले दरपत्रक दि. २७/०९/२०२२ रोजी १५.०० वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात या कार्यालयास सादर करण्यात यावे.

**(इम्तियाज काझी)**
**राज्य प्रकल्प समन्वयक**
**तथा सहसंचालक (प्रशा)**
**म.प्रा.शि.प., मुंबई**

D:\Bhosale\Letter.docx